# पोलीस पाटील रिक्त पद भरती - 2023

क्र.पो.पा./एमएजी/कावि/263 /2023
उपविभागीय दंडाधिकारी वाळवा,
उपविभागीय दंडाधिकारी वाळवा यांचे कार्यालय,
नविन प्रशासकीय इमारत, पेठ-सांगली रोड,
इस्लामपूर, ता.वाळवा जि.सांगली
पिन:-415 409,
Email ID: sdowalwa@gmail.com
दुरध्वनी क्रमांक : 02342-225673

## जाहीरनामा

वाळवा व शिराळा तालुक्यांतील खालील गावातील नागरिकांना कळविणेत येते की, खाली नमूद केलेल्या गावांचे आरक्षणाप्रमाणे रिक्त असलेली पोलीस पाटील पदे भरणेत येणार आहेत. ज्या उमेदवारास पोलीस पाटील म्हणून काम करण्याची इच्छा आहे त्यांनी उपविभागीय दंडाधिकारी वाळवा विभाग इस्लामपूर यांचेकडे दिनांक 20.02.2023 ते 27.02.2023 पर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी 9.45 ते सायंकाळी 6.15 वाजेपर्यंत सुट्टीचे दिवस वगळून) अर्ज करावेत. वरील तारखेनंतर तसेच वेळेनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणर नाही. त्याच प्रमाणे खालील अटी पूर्ण करण्यास पात्र असणा-या उमेदवारांनीच अर्ज करावे. अर्ज उपविभागीय दंडाधिकारी वाळवा यांचे कार्यालयात उपलब्ध होतील.

**विविध प्रवर्गाच्या आरक्षणासाठी खालील प्रमाणे गावे प्रस्तावित आहेत.**

| अ.क्र. | गावाचे नांव | आरक्षणाचा प्रवर्ग |
|---|---|---|
| 1 | सोबत जोडलेल्या परिशिष्टाप्रमाणे | |

**पोलीस पाटील पदावरील भरतीचा कार्यक्रम खालील प्रमाणे**

| अ.क्र. | कार्यक्रम तपशिल | तारीख / ठिकाण / वेळ |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| 1 | अर्ज वाटप व स्वीकारणे | दि. 20.02.2023 ते 27.02.2023<br>(सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत<br>(सकाळी 9.45 ते सायंकाळी 6.15 वाजेपर्यंत)<br>स्थळ - उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय वाळवा, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पेठ-सांगली रोड, इस्लामपूर |
| 2 | परीक्षा शुल्क | आरक्षित/आर्थिक दुर्बल घटक प्रवर्गासाठी - 300/-<br>खुला प्रवर्गासाठी - 500/- |
| 3 | प्राप्त अर्जाची छाननी | दि.28.02.2023 ते दि.06.03.2023 |
| 4 | परिक्षेस पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दि.06.03.2023 (छाननीनंतर )<br>उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,वाळवा, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पेठ-सांगली रोड, इस्लामपूर |
| 5 | लेखी परीक्षा दिनांक व वेळ | दि.13.03.2023<br>(स्थळ व वेळ प्रवेशपत्रात कळविणेत येईल ) |
| 6 | लेखी परीक्षा उत्तीर्ण व मुलाखतीस पात्र उमेदवाराची यादी प्रसिध्द करणे | दिनांक - 15.03.2023<br>स्थळ - उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,वाळवा, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पेठ-सांगली रोड, इस्लामपूर |

| | | |
|---|---|---|
| 7 | पात्र उमेदवारांची तोंडी मुलाखतीचा दिनांक | दि.17.03.2023 वेळ - सकाळी 10.00 पासून संपेपर्यंत<br>स्थळ - उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,वाळवा, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पेठ-सांगली रोड, इस्लामपूर |
| 8 | पात्र उमेदवारांची अंतिम निवड यादी प्रसिध्द करणे | दि.17.03.2023<br>स्थळ - उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,वाळवा, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पेठ-सांगली रोड, इस्लामपूर |

सदर पोलीस पाटील पद भरती बाबत विहीत नमुन्यातील अर्ज उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय वाळवा, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पेठ-सांगली रोड, इस्लामपूर येथे उपलब्ध आहेत. सदरच्या अर्जासाठी उमेदवारांकडून र.रु.100/- इतके शुल्क आकारण्यात येईल.

❖ ***पोलीस पाटील पदासाठी अर्ज करणा-या व्यक्तीची पात्रता खालील प्रमाणे आवश्यक आहे.***

1. अर्ज करणा-या व्यक्तीचे वय, दिनांक 20.02.2023 रोजी 25 वर्षापेक्षा कमी व 45 वर्षापेक्षा जास्त नसावे.

2. अर्ज करणा-या व्यक्तीची शैक्षणिक पात्रता ही इयत्ता 10 वी उत्तीर्ण असावी.

3. अर्जदार व्यक्ती त्याच गावचा स्थानिक रहिवाशी असणे आवश्यक आहे.

4. अर्जदार त्या गावचा स्थानिक रहिवासी असलेबाबत त्या संबंधिची कागदपत्रे अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे.

5. अर्जदार व्यक्ती पोलीस पाटील पदाची कर्तव्ये बजाविणेस शारीरीकदृष्टया सक्षम असावी.

6. अर्जदार व्यक्तीस कोणत्याही गुन्हयात कोणत्याही प्रकारचा दंड अगर शिक्षा झालेली नसावी.

7. ज्या प्रवर्गासाठी सदरचे पद भरणेत येणार आहे अशा प्रवर्गातील व्यक्तीनेच अर्ज करणे बंधनकारक आहे.

8. अर्जदार व्यक्ती सरकारी थकबाकीदार नसावी.

9. अर्जदार व्यक्तीस वर नमूद केलेल्या पात्रते बरोबरच निवडीकरिता इयत्ता 10 वी पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारित 80 गुणांची वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी (Objective & Multiple Choices) स्वरूपाची लेखी परीक्षा घेण्यात येईल यामध्ये सामान्य ज्ञान, गणित, स्थानिक परिसराची माहिती व चालू घडामोडीचा समावेश असेल. प्रत्येक प्रश्न 1 गुणाचा राहील. लेखी परीक्षेमध्ये 80 गुणापैकी किमान 36 गुण (45%) प्राप्त करणारे उमेदवार तोंडी परीक्षेस पात्र ठरतील.

10. अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्राच्या सत्यप्रती जोडाव्यात. अर्जदाराने परिक्षेस येताना स्वखर्चाने यावे.

11. लेखी परीक्षेत मुलाखतीस पात्र उमेदवारास 20 गुणांच्या तोंडी (मुलाखत) परिक्षेस उपस्थित राहणे अनिवार्य आहे. तोंडी परीक्षेस येतेवेळी जन्म तारीख, शैक्षणिक पात्रता, जातीचा दाखला, संबंधित पोलीस निरीक्षक/सहा.पोलीस निरीक्षक यांच्या दाखल्याच्या मूळ प्रती आणाव्यात. तोंडी परीक्षेस अनुपस्थित राहणारा उमेदवार अंतिम निवडीकरिता अपात्र ठरेल.

12. अर्जदारास मराठी भाषेचे ज्ञान असणे अनिवार्य आहे.

13. अर्जासोबत लहान कुटूंबाचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र (कार्यकारी दंडाधिकारी यांचेसमोर केलेले) जोडणे आवश्यक आहे.

14. आरक्षित संवर्गातील अर्जदाराने पुरावा म्हणून सक्षम प्राधिकारी यांचे दिलेले जातीचे प्रमाणपत्राची सत्यप्रत व अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती वगळून उर्वरित आरक्षण संवर्गासाठी खुल्या प्रवर्गातील

(महिला आरक्षणासह) उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचेकडील नॉन क्रिमीलेअर (NCL) प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडणे बंधनकारक आहे.

15. विधीसंम्मत कालावधी पश्चात अर्जदारास दोन पेक्षा जास्त अपत्ये असल्यास उमेदवार अपात्र ठरेल.

16. अर्जदार कोणत्याही राजकिय पक्षाचा अथवा संघटनेचा पदाधिकारी / सदस्य नसावा.

17. अर्जदार हा जाहिरनाम्याच्या दिनांकास शासकीय नोकर, निमशासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेचा नोकर, सहकारी संस्थेचा संचालक/सदस्य, अथवा पदाधिकारी नसावा. नियुक्तीबाबत कोणत्याही राजकिय पक्षाचा अथवा संघटनेचा दबाव आणलेस अर्ज रद्द करणेत येईल.

18. यापूर्वी अर्ज केलेला असल्यास तो विचारात घेतला जाणार नाही. या जाहिरनाम्यानुसार पुन्हा अर्ज करणे आवश्यक राहील.

**19. अर्जदारास प्रवेश पत्र हे** दिनांक 09/03/2023 ते 10/03/2023 अखेर कार्यालयीन वेळेत उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वाळवा यांचे कार्यालयात देण्यात येईल. सदरचे प्रवेश पत्र अर्जदार यांनी स्वतः उपविभागीय दंडाधिकारी वाळवा यांचे कार्यालयातून घेवून जाणे अनिवार्य आहे. प्रवेशपत्र पोस्टाने अथवा ऑनलाईन पाठविले जाणार नाही. प्रवेश पत्रात परिक्षेचे ठिकाण व वेळ नमूद केले जाईल.

20.आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्ल्यूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:राआधो-4019/प्र.क्र.31/16-अ, दिनांक 12 फेब्रुवारी 2019 व दिनांक 31 मे 2021 अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, अर्ज सादर करतेवेळी सादर करणे बंधनकारक आहे.

21.अद्यावत नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र/आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणून सक्षम प्राधिका-याने वितरित केलेले व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

22. कोणत्याही टप्प्यावर आक्षेपाबाबतचा अंतिम निर्णय हा उपविभागीय दंडाधिकारी वाळवा यांचा असेल.

❖ ***अर्जदार व्यक्तीने त्यांचे अर्जासोबत खालीलप्रमाणे पुराव्याची कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. व मुलाखतीचेवेळी मूळ कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.***

1. शैक्षणिक पात्रतेच्या पुराव्याच्या कागदपत्रांच्या सत्यप्रती.
2. माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्राची सत्यप्रत.
3. वयाचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याच्या दाखल्याची किंवा जन्म तारखेच्या दाखल्याची सत्यप्रत.
4. संबंधीत गावचा स्थानिक रहिवाशी असलेबाबत तहसिलदार यांचे अधिवास प्रमाणपत्र, ग्रामपंचायतीकडील घर कर आकारणी पत्रक किंवा शेतजमीन असलेस 7/12 उतारा व 8 अ उतारा मुळ प्रत इत्यादी.
5. आरक्षित संवर्गातील अर्जदाराने पुरावा म्हणून सक्षम प्राधिकारी यांचे दिलेले जातीचे प्रमाणपत्राची सत्यप्रत व अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती वगळून उर्वरित आरक्षण संवर्गासाठी खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षणसह) उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचेकडील नॉन क्रिमीलेअर (NCL) प्रमाणपत्राची सत्यप्रत.
6. सरकारी थकबाकीदार नसलेबाबत तलाठी, ग्रामसेवक यांचा दाखला.
7. कोणत्याही गुन्हयात दंड अगर शिक्षा झाली नसलेबाबत आणि पोलीस पाटील पदासाठी चारित्र्य व वर्तणूक चांगली असलेबाबत संबंधित पोलीस निरीक्षक/सहा.पोलीस निरीक्षक यांचा दाखला.
8. अर्जदाराने स्वत:चे पासपोर्ट आकाराचे अलीकडील काळात काढलेले दोन फोटो (दोन फोटोपैकी एक राजपत्रीत अधिकारी यांचेव्दारा साक्षांकीत) अर्जात नमूद केलेल्या ठिकाणी चिकटविणे.
9. अर्जासोबत राखीव प्रवर्गातील अर्जदारांनी रु.300/- व खुला प्रवर्गातील अर्जदारांनी रु.500/- परीक्षा शुल्क अर्जासोबत देणे आवश्यक आहे. सदरचे परिक्षा शुल्क हे ना परतावा असलेने परत मिळणार नाही.

10. अर्जदार यांनी लहान कुटूंबाचे (दोन अपत्ये) असलेबाबत तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांचे :
केलेले प्रतिज्ञापत्र. (प्रतिज्ञापत्राचा नमुना सोबत जोडला आहे.)

**निवड झालेल्या उमेदवाराने सादर करावयाची कागदपत्रे.**

1. शारिरीक दृष्ट्या सक्षम असलेबाबतचा जिल्हा शल्य चिकीत्सक सांगली यांचेकडील प्रमाणपत्र 1 महिन्याचे आत सादर करणे बंधनकारक आहे.

2. निवड झालेल्या राखीव संवर्गातील अर्जदारांनी 6 महिन्यात जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

3. कोणत्याही गुन्हयात दंड अगर शिक्षा झाली नसलेबाबत आणि पोलीस पाटील पदासाठी चारित्र्य व वर्तणूक चांगली असलेबाबत जिल्हा पोलीस अधिक्षक यांचा दाखला 1 महिन्याचे आत सादर करणे बंधनकारक आहे. उपरोक्त नमूद केलेली 1 ते 3 कागदपत्रे अर्जदारांनी मुदतीत सादर न केलेस झालेली निवड रद्द करणेत येईल.

जर एखादी नियुक्ती चुकीच्या अथवा खोट्या सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे झाली आहे किंवा विहित नियमांचे व आदेशांचे पालन न करता झाली आहे असे निदर्शनास आल्यास झालेली नियुक्ती रद्द करण्याचे अधिकार उपविभागीय दंडाधिकारी यांना राहतील.

उपविभागीय दंडाधिकारी वाळवा विभाग, इस्लामपूर

**(प्रदीप उबाळे)**
**अध्यक्ष पोलीस पाटील निवड समिती**
**तथा प्र.उपविभागीय दंडाधिकारी वाळवा**
**विभाग इस्लामपूर**

**प्रतः- तहसिलदार वाळवा तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी,वाळवा/तहसिलदार शिराळा तथा तालूका कार्यकारी दंडाधिकारी, शिराळा/अपर तहसिलदार आष्टा तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी आष्टा यांना,**
2/- सदरचा जाहिरनामा आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**प्रतः- गट विकास अधिकारी पंचायत समिती, वाळवा / शिराळा**

**प्रतः- तलाठी ------------------ ता.वाळवा/ता.शिराळा**
2/- सोबत जाहिरनाम्यांची प्रत पाठविली असून सदरची प्रत चावडीचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावी तसेच सदरचा जाहिरनामा दंवडीने प्रसिध्द करून तात्काळ दवंडी रजिष्टरचे उता-यासह अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**प्रतः ग्रामसेवक, ग्रामपंचायत ----------------- ता.वाळवा / ता. शिराळा**
2/- सोबत जाहिरनाम्याची प्रत पाठविली असून सदरची प्रत ग्रामपंचायतीचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करून अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**प्रत, जिल्हा सुचना व विज्ञानकेंद्र सांगली. -**
सोबत जाहिरनाम्याची प्रत पाठविली असून सदरची प्रत जिल्हा सुचना व विज्ञान केंद्र सांगली (www.sangli.nic.in) या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत यावी.

ठिकाण : वाळवा
दिनांक :20/02/2023

उपविभागीय दंडाधिकारी वाळवा विभाग, इस्लामपूर

**(प्रदीप उबाळे)**
**अध्यक्ष पोलीस पाटील निवड समिती**
**तथा प्र.उपविभागीय दंडाधिकारी वाळवा**
**विभाग इस्लामपूर**

## परिशिष्ट

### वाळवा उपविभागाअंतर्गत वाळवा व शिराळा तालुक्यातील रिक्त असणा-या पोलीस पाटील पदांची गावनिहाय व आरक्षणनिहाय माहिती पुढीलप्रमाणे

1) आरक्षण- अनुसूचित जाती- (एकूण पदे-4 पैकी महिला-02 पदे)

| अ.क्र. | रिक्त पद असणारे गाव | अ.क्र. | रिक्त पद असणारे गाव |
|---|---|---|---|
| 1. | शिरटे | 3. | नाटोली |
| 2. | करमाळे **(महिला)** | 4. | सोनवडे **(महिला)** |

2) आरक्षण- अनुसूचित जमाती- (एकूण पदे-13 पैकी महिला-4 पदे)

| अ.क्र. | रिक्त पद असणारे गाव | अ.क्र. | रिक्त पद असणारे गाव |
|---|---|---|---|
| 1. | बिळाशी | 8. | वाळवा |
| 2. | रांजणवाडी | 9. | बागणी |
| 3. | गवळेवाडी | 10. | भाटवाडी |
| 4. | चरण | 11. | अंत्री बुद्रूक **(महिला)** |
| 5. | माळेवाडी **(महिला)** | 12 | कांदे **(महिला)** |
| 6. | बहे | 13 | येळापूर **(महिला)** |
| 7. | येलूर | | |

3) आरक्षण- विशेष मागास प्रवर्ग- (एकूण पदे-2)

| अ.क्र. | रिक्त पद असणारे गाव | अ.क्र. | रिक्त पद असणारे गाव |
|---|---|---|---|
| 1. | इटकरे | 2. | कणदूर |

4) आरक्षण- विमुक्त जाती-अ (एकूण पदे-01 पैकी महिला 01 पद)

| अ.क्र. | रिक्त पद असणारे गाव | अ.क्र. | रिक्त पद असणारे गाव |
|---|---|---|---|
| 1. | कुसळेवाडी **(महिला)** | | |

5) आरक्षण-भटक्या जमाती-ब (एकूण पदे-01 पैकी महिला-01 पद)

| अ.क्र. | रिक्त पद असणारे गाव | अ.क्र. | रिक्त पद असणारे गाव |
|---|---|---|---|
| 1. | महादेववाडी **(महिला)** | | |

6) आरक्षण- इतर मागास वर्ग (एकूण पदे-12 पैकी महिला-06 पदे)

| अ.क्र. | रिक्त पद असणारे गाव | अ.क्र. | रिक्त पद असणारे गाव |
|---|---|---|---|
| 1. | मोहरे **(महिला)** | 7. | ओझर्डे |
| 2. | काळूंद्रे **(महिला)** | 8. | साटपेवाडी |
| 3. | चिंचेवाडी | 9. | पाडळी **(महिला)** |
| 4. | विठ्ठलवाडी **(महिला)** | 10. | वाकुर्डे खुर्द **(महिला)** |
| 5. | वाघवाडी | 11. | शिवरवाडी |
| 6. | मालेवाडी | 12. | खेड **(महिला)** |

7) आरक्षण- आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) (एकूण पदे-04 पैकी महिला-01 पद)

| अ.क्र. | रिक्त पद असणारे गाव | अ.क्र. | रिक्त पद असणारे गाव |
|---|---|---|---|
| 1. | केदारवाडी | 3. | अस्वलेवाडी |
| 2. | औंढी **(महिला)** | 4. | सावंतवाडी |

8) आरक्षण- अराखीव (एकूण पदे-04 पैकी महिला-04 पदे)

| अ.क्र. | रिक्त पद असणारे गाव | अ.क्र. | रिक्त पद असणारे गाव |
|---|---|---|---|
| 1. | नायकलवाडी **(महिला)** | 3. | मोरेवाडी **(महिला)** |
| 2. | बेरडेवाडी **(महिला)** | 4. | पाचगणी **(महिला)** |

ठिकाण : वाळवा

दिनांक : 20/02/2023

उपविभागीय दंडाधिकारी, वाळवा विभाग, इस्लामपूर

(प्रदीप उबाळे)

अध्यक्ष पोलीस पाटील निवड समिती

तथा प्र.उपविभागीय दंडाधिकारी वाळवा

विभाग इस्लामपूर